**जगभर**

# तुर्कस्तान : छोटा विजय, मोठा पराजय

**चंद्रशेखर पुरंदरे**

धर्माचे प्राबल्य राष्ट्रीय संवादात वाढवून अधिकारशाहीकडे वाटचाल हे ध्वनी आपल्याकडे ऐकू येत आहेत. त्या दृष्टीने तुर्कस्तानमधील जूनमधल्या निवडणुका पहाणे उचित ठरेल.

मुस्लिम जगात तुर्कस्तान एकमेव आहे, अशा अर्थी की तो लोकशाही देश आहे, आधुनिक आहे, पश्चिमेचे चांगले गुणधर्म त्याने अंगिकारलेले आहेत आणि अर्थव्यवस्था इतर प्रमुख इस्लामी राष्ट्रांसारखी तेलावर अवलंबून नाही, पण उत्पादक उद्योगांनी देश समृद्ध केलेला आहे. त्याचे भौगोलिक स्थानही वैशिष्ट्यपूर्ण आहे. युरोप व आशिया दोन्ही खंडांच्या सीमा तेथे मिळतात. आधुनिक तुर्कस्तानचा संस्थापक कमाल अतातुर्क याने पारंपरिक इस्लामशी हेतुपुरस्सर फारकत घेऊन देश निधर्मी तत्त्वांवर, पश्चिमाभिमुख व विज्ञानाभिमुख केला. अतातुर्कनंतर मात्र घटनाक्रम विचित्र होऊन लष्कराचा राजकारणातील हस्तक्षेप वाढला, त्याचवेळी निधर्मी मूल्ये राखली जातील याची हमी देणारी लष्कर हीच संस्था राहिली. निर्वाचित सरकारे कधी भ्रष्ट, कधी अस्थिर झाल्यावर लष्कर हस्तक्षेप करून सत्ता ताब्यात घेत असे.

या इतिहासानंतर १९९४ ते १९९८ पर्यंत इस्तंबूल या दुसऱ्या राजधानीचा महापौर एर्दोगान केंद्रीय निवडणुकांत उतरला. तो २०१४ पर्यंत देशाचा पंतप्रधान राहिला. या दरम्यान पहिल्या काही वर्षांत त्याचे देशासाठीचे योगदान महत्त्वाचे राहिले. एकतर अर्थव्यवस्था सुधारली. दुसरे म्हणजे लष्कराला राजकारणातून कायमचे हद्दपार करण्यात आले. त्यासाठी अनेक उच्चपदस्थ लष्करी अधिकाऱ्यांना केंद्रसत्ता उलथण्याच्या कारवाया केल्याबद्दल अटक, खटले व तुरूंगवासही देण्यात आला. त्यामुळे लष्कराची राजकारणातील ढवळाढवळ संपुष्टात आली.

२०११ पर्यंत एर्दोगानची कारकीर्द त्यामुळे सगळ्याच मुस्लिम देशांसाठी - म्हणजे मध्यपूर्वेतील हुकूमशाहीखाली असणाऱ्या मुस्लिम जनतेसाठी - आशादायक व आदर्श झाली, की भविष्यात कधीतरी आमचा समाजही तुर्कस्तानसारखा होईल.

पण आपण दाखवू की पूर्व दिशा अशा अहंकाराची बाधा तद्‌नंतर एर्दोगानला झाल्याचे दिसू लागले. अर्थव्यवस्था मंदावली, बेरोजगारी वाढायला लागली आणि राजवटीवर प्रचंड भ्रष्टाचाराचे आरोपही होऊ लागले. त्यातील काही एर्दोगानच्या कुटुंबीयांवरही झाले. बांधकाम व्यवसायाला विशेष सवलती देऊन शहरामधील हिरवळ बळकावण्याच्या विरोधात २०१३ साली इस्तंबूलमध्ये मोठी निदर्शने झाली व त्यात पोलिसांनी अनावश्यक दडपणूक केली. त्यामुळे विशेषत: शिक्षित, व्यावसायिक, निधर्मी मध्यमवर्ग राजवटीच्या व व्यक्तिश: एर्दोगानच्या विरुद्ध जाऊ लागला. 'आपला विरोध हा देशद्रोह' ही उत्तरकालातील इंदिरा गांधींच्या सारखी मानसिकता दिसू लागली. महत्त्वाकांक्षेने (वस्तुत: असुरक्षिततेच्या गंडाने) २०१४ साली तेव्हाचा राष्ट्राध्यक्ष निवृत्त झाल्यावर एर्दोगानने स्वत:ला राष्ट्राध्यक्ष करून घेतले. आपल्या घटनेसारखेच संकेत तुर्कस्तानमध्ये आहेत. राष्ट्राध्यक्ष हे जास्त करून शोभेचे व नामधारी पद असते, राष्ट्राध्यक्षाने सरकारच्या दैनंदिन कामात ढवळाढवळ करू नये, पक्षीय राजकारणाच्या वर रहावे, इत्यादी. एर्दोगानने हे संकेत मानले नाहीत. राष्ट्राध्यक्ष झाल्यावरही मंत्रिमंडळाच्या बैठकी घेणे, महत्त्वाचे निर्णय पंतप्रधानाने घेण्याऐवजी स्वत: घेणे असा पायंडा पाडायला सुरूवात केली. त्याच्या स्वप्रेमाने कळस गाठला तो मागच्या वर्षी. स्वत:साठी १००० खोल्यांचा अतिविशाल, अतिविलासी प्रासाद त्याने बांधून घेतला. (आपल्याकडचा स्वत:च्या नावाचा सूट हे चिल्लर स्वप्रेम म्हणावे लागेल!) तो प्रासादही वनखात्याची संरक्षित जमीन बेकायदेशीररीत्या बळकावून झाला. तुरळक विरोधाचे आवाज उमटल्यावर 'बांधकाम पाडून दाखवा' असा उर्मटपणा आणि अरेरावी एर्दोगानने केली.

देशाच्या आणि एकूण मध्यपूर्व-युरोपच्या दृष्टीने काळजी करण्यासारखी परिस्थिती लवकरच निर्माण होऊ लागली. ती म्हणजे एर्दोगान उघडपणे उदारमतवादाला दडपणाऱ्या, निधर्मीपणाला तुच्छ मागणाऱ्या पारंपारिक इस्लामचा पुरस्कार करू लागला. तुर्कस्तान त्या दिशेनेच गेला पाहिजे आणि तो तसा नेणे हे माझे धार्मिक कर्तव्य व ध्येय आहे असा थाट आता त्याच्या आचरणात आला. मग या औद्धत्याने विसंवादी पत्रकारांना, विरोधकांना तुरूंगात टाकणे सुरू झाले. आज जगातील कोणत्याही देशापेक्षा जास्त पत्रकार तुर्कस्तानमध्ये तुरूंगात आहेत.

निवडणुका या पार्श्वभूमीवर झाल्या. त्यात एर्दोगानने स्वत:च्या पक्षाचा हिरीरीने प्रचार केला. वस्तुत: राष्ट्राध्यक्षासाठी हे अप्रस्तुत वर्तन होते. पण त्याचा उद्देश नव्या लोकसभेत बहुमत मिळवणे हा होता. बहुमत मिळवल्यानंतर घटनादुरुस्ती करणे व स्वत:ला तहहयात अध्यक्ष करून घेणे हा त्याचा हेतू होता. शिवाय सगळी सत्ता पंतप्रधानाकडून राष्ट्राध्यक्षाच्या हाती केंद्रित करणे हा आधी सुरू केलेला प्रकल्प वैध करून घेणे हाही उद्देश होता. त्यामुळे निवडणूक ही एर्दोगानच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेची कसोटी ठरली.

निवडणुकीत ८६% मतदान झाले. मतदानात मागच्या निवडणुकीत एर्दोगानच्या पक्षाने केली तशी हेराफेरी होऊ नये म्हणून स्वयंसेवकांनी व विरोधी पक्षांनी प्रत्येक मतदान केंद्रावर हजेरी लावून पूर्ण वेळ निरीक्षण केले. निकाल जाहीर झाले तेव्हा सगळ्यांनाच धक्का बसला. एर्दोगानच्या पक्षाला लोकसभेत आधीच्या सारखे स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यांच्या मतांची टक्केवारी आधीच्या निवडणुकीतील ५०% हून ४०% वर घसरली. स्वत:ची प्रतिष्ठा व महत्त्वाकांक्षा पणाला लावल्याने हा एर्दोगानचा वैयक्तिक पराभव मानला जात आहे. लोकशाही मार्गाने हुकूमशाही आणण्याचा हा रशियाच्या पुतीनसारखा प्रयोग होता. पण तो फसला. जनमताचा कौल आपल्याला मान्य आहे असे त्याने आतातरी म्हटले आहे. पंतप्रधानाने आता पुढच्या दीड महिन्यात सरकारची जमवाजमव करायची आहे. स्पष्ट बहुमत नसल्याने इतर तीन-चार पक्षांबरोबर आघाडीचे सरकार ही एक शक्यता आहे; नाहीतर परत निवडणुका घ्याव्या लागतील. इतर पक्षांचे बलाबल, त्यांचे आदर्शवाद व भूमिका इतक्या खोलात जाण्याची जरूरी नाही पण एक अतिउजवा पक्ष त्यातल्या त्यात एर्दोगानच्या पक्षाला जवळचा आहे. त्याच्या नेत्याला एर्दोगानचे तहहयात अध्यक्ष होणे मंजूर नाही.

निवडणुकीतील लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचा निकाल म्हणजे कुर्द लोकांच्या संघटनेला प्रथमच प्रतिनिधित्व मिळाले. कुर्दवंशीय लोक तुर्कस्तान, इराक, सीरिया व इराण येथील संलग्न प्रदेशात आहेत. ते मुस्लिम असले तरी अरबही नाहीत (इराक, सीरियातील बहुसंख्यांकांप्रमाणे), पर्शियनही नाहीत (इराणमधील बहुसंख्यांक) किंवा तुर्कही नाहीत. त्यांच्या स्वत:च्या परंपरा, श्रद्धा निराळ्या आहेत. वस्तुत: त्यांना अंतिमत: स्वत:चे राष्ट्र निर्माण करायचे आहे पण हे सद्यस्थितीत शक्य नाही कारण सीरियात यादवी चालू आहे, इराणमध्ये केंद्र सरकार त्यांना दडपते. त्यातल्या त्यात पहिल्या इराक युद्धानंतर (१९९१) त्यांना उत्तर इराकमध्ये स्वायत्त प्रदेश तरी मिळाला. तसाच प्रदेश तुर्कस्तानमध्ये मिळावा ही त्यांची मागणी गेली ३०-३५ वर्षे आहे.

त्यांच्या पक्षाने या स्वत:च्या वांशिक उद्दिष्टाबरोबर निधर्मी, उदारमतवादी, ख्रिश्चन, समलिंगी अशा अल्पसंख्याकांबरोबरही या निवडणुकीसाठी युती केली. तुर्कस्तानमध्ये एखाद्या पक्षाला किमान १०% मते मिळाली तरच तो लोकसभेत प्रविष्ट होऊ शकतो. आजवर कुर्द लोकांना हे जमले नव्हते पण या निवडणुकीत त्यांना १३% मते मिळाली. त्यामुळे त्यांच्याबरोबरच इतर परिघावरच्या अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व मिळणे ही आशादायक प्रगती निवडणुकीत झाली आहे. इस्लामच्या एर्दोगान-प्रचलित अन्वयार्थाने या अल्पसंख्याकांचे अस्तित्वच नाकारण्यात येत होते. परिणामत: त्यांच्या अस्तित्वाची दखलही घेतली जात नव्हती व घेतली गेलीही नसती. आता हा एक पक्ष म्हणून ओळखला गेल्याने त्याला देवघेवीची ताकद मिळाली आहे.

म्हणजे, एर्दोगानच्या एकाधिकारशाही वाटचालीला आळा आणि अल्पसंख्याकांच्या न्याय्य मागण्यांना आवाज मिळणे या दोन मुद्द्यांवर तुर्कस्तानची लोकशाही अधिक बळकट झाली आहे.

अर्थात आघाडीच्या बेरीज-वजाबाक्या न जमल्यास निवडणूक परत घ्यावी लागेल. ती निर्वाचित लोकशाहीची कायमची शक्यता असते. तसे झाल्यास काय चित्र पुढ्यात येईल हे आज सांगता येणार नाही.

## *जगभरात अन्यत्र –*

### व्यक्तिस्वातंत्र्याचा विजय

दोन वर्षांपूर्वी एडवर्ड स्नोडेन नावाच्या कॉम्प्युटर तज्ज्ञाने अमेरिकन सरकार आपल्याच नागरिकांवर त्यांना अंधारात ठेवून सतत पाळत ठेवत आहे हे उघडकीला आणले. ही कारवाई सप्टेंबर २००१ पासून राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली चालू होती व आजतागायत त्यात एकाही संभाव्य दहशतवादी कटाची माहिती मिळालेली नाही. स्नोडेनला देशद्रोही ठरवण्यात आले व तो रशियाच्या आश्रयाला गेला. दरम्यान ही पाळत हा आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आहे हे लोकांनी ओळखले. बदललेले जनमत पाहून सरकारने या कायद्याचे नूतनीकरण केले नाही. अमेरिकन कोर्टानेही अलिकडेच ही पाळत बेकायदेशीर ठरवली. हा व्यक्तिस्वातंत्र्याचा विजय आहे.

मात्र स्नोडेनने गोळा केलेली पण आजवर प्रसिद्ध न झालेली गोपनीय माहिती आता रशिया व चीनच्या हाती लागली आहे. त्यामुळे अमेरिका, ब्रिटन यांचे जगभरचे गुप्तहेरांचे जाळे त्यांना कळले आहे. परिणामत: या देशांनी गुप्तहेर माघारी बोलावले आहेत. साम्राज्यवादाचा हा अल्पसा पराभव आहे.

### पैशाचा खेळ

आपल्याकडच्या आयपीएलच्या क्रिकेटपेक्षा कित्येकपट जास्त पैसा आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये गुंतलेला असतो. स्पर्धा कोणत्या देशात भरवायच्या, त्यांची स्पॉन्सरशिप, तिकीटविक्री यात वर्षानुवर्षे गैरव्यवहार होत आहेत. त्यात नियामक समितीचे काही सदस्य अब्जाधीश झाले आहेत. आता कोठे हे प्रकरण बाहेर येत आहे व काही सदस्यांना अटक झाली आहे.

खेळाच्या खऱ्या चाहत्यांनी या चौकशीचे स्वागत केले आहे कारण शेवटी हा पैसा देशोदेशीच्या सामान्य माणसाचा आहे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*